नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १४ Issue - 14 | वार शनिवार दि. ३१ मे २०२५ Blow- Saturday Date 31 May 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## ... तर पाकचे चार चुकडे झाले असते

### राजनाथसिंह यांच्याकडून नौदलाच्या कामगिरीचे कौतुक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वृत्तसंस्था, नवी दिल्ली : '१९७१च्या युद्धात नौदलही उतरल्याने पाकिस्तानचे दोन तुकडे झाले होते. 'ऑपरेशन सिंदूर'च्या वेळीही आपल्या नौदलाने पाकिस्तानवर वचक ठेवण्याची काम गिरी बजावली. या मोहिमेत आपल्या नौदलावर सक्रिय होण्याची वेळ आली असती तर पाकिस्तानचे चार तुकडे झाले असते,' अशा शब्दांत संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी शुक्रवारी पाकिस्तानला ठणकावले.



राजनाथसिंह यांनी शुक्रवारी गोव्याच्या समुद्रात तैनात असणाऱ्या 'आयएनएस विक्रांत'ला भेट देऊन नौदलाच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधला.

आयएनएस विक्रांत ही देशी बनावटीची पहिली विमानवाहू युद्धनौका आहे. ऑपरेशन सिंदूर दरम्यान या युद्धनौकेने समुद्रात खोलवर गस्त घालून पाकिस्तानी नौदलाचे मनसुबे उधळले होते. या पार्श्वभूमीवर राजनाथ यांनी या युद्धनौकेस भेट देऊन नौदल अधिकाऱ्यांचे कौतुक केले. 'आपले हवाई दल पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त करत असताना नौदलाने अरबी समुद्रात अतिशय आक्रमकपणे युद्धसज्जता राखली होती. यामुळेच पाकिस्तानी नौदल काही आगळीक करण्याचे धैर्य दाखवू शकले नाही,' असे ते म्हणाले.

'या मोहिमेदरम्यान भारतीय नौदल सुप्तपणे कार्यरत होते; परंतु या मोहिमेचा प्रत्यक्ष भाग होण्याची वेळ नौदलावर आली असती तर पाकिस्तानचे चार तुकडे झाले असते. पाकिस्तानने भविष्यात भारतासोबत काही आगळीक करण्याचा प्रयत्न केला तर भारतीय नौदलाच्या सामर्थ्याची चव त्यांना चाखावी लागेल. याबाबत सरकारने नौदलाला मोकळीक दिली आहे,' असा इशारा त्यांनी पाकिस्तानला दिला.

'पाकपुरस्कृत दहशतवादाचा बिमोड करण्यासाठी पाकिस्तान विचार करू शकेल, असे उपाय आम्ही करूच; परंतु त्यांच्या कल्पनेच्या पलीकडची कारवाई करण्यासही भारत समर्थ आहे. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये झालेले हल्ले एवढे शक्तिशाली होते की भारताला रोखा, अशी विनंती पाकिस्तानला जगभरात करावी लागली,' याकडे राजनाथसिंह यांनी लक्ष वेधले.

#### हाफीज, मसूदला भारताकडे सोपवा

**'भारतासोबत पाकिस्तानला पुन्हा चर्चा करायची असेल तर त्यांनी प्रथम हाफीज सईद व मसूद अझर या दहशतवाद्यांना भारताकडे सोपवावे. हे दोघे केवळ भारताला हव्या असणाऱ्या दहशतवाद्यांच्या यादीत आहेत असे नव्हे; तर अमेरिकेनेही त्यांना दहशतवादी म्हणून घोषित केले आहे,' असे राजनाथ म्हणाले.**

## २२८९ सरकारी कर्मचाऱ्यांनी लाडकी बहीण योजनेचा घेतला फायदा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा महाराष्ट्रातील लाखो महिलांना लाभ मिळत आहे. राज्य सरकारने कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न कमी असणाऱ्या महिलांना लाभ देण्यासाठी लाडकी बहीण योजना सुरु केली होती. या योजनेअंतर्गत सरकारकडून महिलांना दर महिन्याला हजार रुपये धनलाभ दिला जातो. पण यामध्ये निकषात न बसणाऱ्या महिलांनी सुद्धा धनलाभ घेतल्याचे समोर आले आहे. यासंदर्भात शासनाने आता मोठा निर्णय घेतला आहे. अर्जांची पुन्हा पडताळणी करुन निकषात न बसणाऱ्या महिलांना योजनेतून वगळण्याच निर्णय शासनाने घेतला आहे.

#### निकषात न बसणाऱ्या महिलांना योजनेतून वगळणार : ना. तटकरे

शासनाने योजनेसंदर्भात आता कठोर भूमिका घेतली आहे. लाभार्थी महिलांच्या अर्जाची पडताळणी करण्यात येत आहे. ज्या महिला या योजनेच्या निकषांत बसत नाहीत, त्यांना योजनेतून वगळण्यात येत आहे. अनेक महिलांचे उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा जास्त आहे. तसेच नावावर घर आणि चारचाकी वाहन असून देखील काही महिलांनी या योजनेचा लाभ घेतल्याचे आढळून आले, जे निकषांविरोधात आहे. धक्कादायक म्हणजे, सरकारी कर्मचारी असलेल्या महिला देखील या योजनेच्या लाभार्थी आहेत. अशा महिलांना योजनेतून वगळण्यात येणार आहे, मंत्री आदिती तटकरे यांनी ट्विट करत याबाबत महत्वाची अपडेट दिली आहे.

अदिती तटकरे म्हणाल्या, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीतही पडताळणीची प्रक्रिया राबवली जात आहे. या प्रक्रियेत सेवार्थ मधील जवळपास २ लाख अर्जांची पडताळणी केल्यानंतर त्यात सुमारे २२८९ सरकारी कर्मचाऱ्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी नाव नोंदणी केल्याची बाब लक्षात आली आहे.

## नव्या वेळापत्रकानुसार ई-बस पुरवठा करण्याची तयारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य परिवहन (एसटी) महामंडळाच्या ताफ्यात ५,१५० ई-बस दाखल करण्यासाठी ईवे ट्रान्स प्रा. लि कंपनीला पुन्हा नवे वेळापत्रक देण्यात येईल. नवे वेळापत्रक देताना महामंडळाचा पुढील पाच वर्षांसाठी होणारा तोटा राज्य सरकारने भरून द्यावा, अशी भूमिका परिवहनमंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी घेतली आहे.

एसटी महामंडळाच्या ताफ्यात भाडेतत्वावरील ई-बस दाखल होत आहेत. मात्र, संबंधित कंपनीकडून वारंवार विलंबाने बस पुरवठा करण्यात येत असून, त्याचा थेट परिणाम प्रवासी वाहतुकीवर होत आहे. याबाबत परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी मंत्रालयात शुक्रवारी बैठक बोलावली होती. यात बस पुरवठा प्रतिनिधींसह वरिष्ठ अधिकारी उपस्थि होते. केंद्राची सबसिडी आणि करारातील अटी-शर्ती लक्षात घेता ई-बस करार रद्द करणे शक्य नसल्याची चर्चा बैठकीत झाली. नव्या वेळापत्रकानुसार ई-बस पुरवठा करण्याची तयारी कंपनीच्या प्रतिनिधींनी दर्शवली आहे.

दरम्यान, बस विलंबामुळे महामंडळाचा अंदाजे ३ हजार कोटींहून अधिक तोटा राज्य सरकारने भरून द्यावा. यासाठी एसटी महामंडळाने राज्य सरकारकडे व्यवहार्यता अंतर अर्थपुरवठ्यासाठी (व्हायबलिटी गॅप फंडिंग) प्रस्ताव पाठवावा. ही तोट्याची रक्कम राज्य सरकारने दिल्यानंतरच बस पुरवठ्याचा हा करार कायम राहू शकेल. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे बैठक घेण्यात येणार आहे.



परिवहन विभागाने अपर मुख्य सचिव व एसटीचे तत्कालीन अध्यक्ष संजय सेठी यांनी सदर कंपनीला बस पुरविण्याबाबतीत जानेवारीत नवे वेळापत्रक दिले. त्यानुसार २२ मे २०२५ पर्यंत १,२८७ बस पुरवण्याचे इशारापत्र दिले होते. मार्च २४ ते मे २५ दरम्यान संबंधित कंपनीने ९ मीटर लांबीच्या १३८ आणि १२ मीटरच्या ८२ अशा २२० ई-बसचा पुरवठा करण्यात आला. जानेवारीत दिलेल्या नव्या वेळापत्रकाची मुदत संपूनही एकही नवी ई-बस कंपनीने महामंडळाला दिली नाही. ही मुदत संपल्याने बसचा करार रद्द करण्याच्या सूचना मंत्री प्रताप सरनाईक यांनी महामंडळाला दिल्या. महामंडळाने विभागनिहाय नवीन खाते तयार करून ई-बसच्या उत्पन्नामधून कंपनीला बिलांची रक्कम दिली जात आहे. त्यानुसार ६० कोटी रुपये कंपनीला देण्यात आले. उर्वरित ४० कोटी रक्कम लवकरच कंपनीला देण्यात येणार असल्याचे महामंडळाचे नियोजन आहे. बस येण्याच्या अपेक्षेने महामंडळाने ८० चार्जिंग स्टेशनसाठी १०० कोटी खर्च केले. हा निधी सरकारने महामंडळाला दिला आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त पशुसंवर्धन विभागामार्फत विविध कार्यक्रम : मंत्री पंकजा मुंडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य, विचार आणि प्रेरणादायी जीवनगाथा जनसामान्यांपर्यंत प्रभावीपणे पोहचविणे आवश्यक असल्याने त्यांच्या ३०० व्या जयंती दिनाचे औचित्य साधून ३१ मे २०२५ रोजी पशुसंवर्धन विभागामार्फत राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.

अहिल्यादेवी या भारतीय इतिहासातील एक तेजस्वी, कर्तबगार व दूरदृष्टी असणाऱ्या स्त्रीशक्तीचे प्रतीक आहेत. त्यांनी धार्मिक सहिष्णूता, समाजकल्याण, सार्वजनिक बांधकाम, न्यायप्रविष्ट प्रशासन आणि स्त्री शिक्षणाच्या माध्यमातून आदर्श राज्यकारभाराची उभारणी केली. त्यांचे कार्य समाजसेवा, धर्मनिष्ठा आणि कुशल प्रशासनाचे प्रतीक असून, ते महाराष्ट्र राज्याच्या प्रगत व उन्नत वाटचालीसाठी नेहमीच पथदर्शी ठरले आहे. यास अनुसरुन 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर' यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त पशुसंवर्धन विभागामार्फत अधिनस्त संस्थांमध्ये कार्यालय/ दवाखाना परिसर स्वच्छता व सुशोभिकरण करणे, गाव पातळीवर वंधत्व/सर्वोपचार शिबिरांचे आयोजन करणे, फिरस्ती मेंढपाळांची भेट घेऊन त्यांना तांत्रिक मार्गदर्शन करणे, मेंढपाळांच्या शेळ्या-मेंढ्यांचे मान्सूनपूर्व लसीकरण करणे, पशुधनाचे जंतनिर्मूलन, गोचीड निर्मूलन, करडे/कोकरे मरतूक कमी करण्याबाबत उपाययोजना करणे, मेंढपाळांसाठी तांत्रिक मार्गदर्शन करण्यासाठी शिबिर/ परिसंवादाचे आयोजन करणे, वृक्ष लागवड करणे इत्यादी उपक्रम राबविण्यात यावेत, अशा सूचना मंत्री मुंडे यांनी दिल्या आहेत. पशुसंवर्धन आयुक्त रामस्वामी एन. आणि पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली जयंती वर्षानिमित्त विभागाच्या मुख्यालयातही अभिवादनपर कार्यक्रम होणार आहे. पशुसंवर्धन विभागाच्या या उपक्रमांमुळे मेंढी-शेळी पालकांशी थेट संवाद साधत शासनाचे विविध उपक्रम, योजना तसेच शेळी-मेंढी तांत्रिक व्यवस्थापनाविषयी माहिती पशुपालकांना देणे शक्य होईल. तसेच शेळी-मेंढीपालनाला आधुनिक व्यवसाय व्यवस्थापनाच्या माध्यमातून अधिक किफायतशीर करण्यासाठी विभागाला आवश्यक धोरणांची निर्मिती व अंमलबजावणी करणे सुलभ होईल, असा विश्वास मंत्री मुंडे यांनी व्यक्त केला आहे.

### मुंबई- नाशिक महामार्गावरील रखडलेल्या कामांना गती द्यावी

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

## एमएसआरडीसीकडून राज्यात सुरू असलेल्या कामांचा वेग वाढवा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून सुरू असलेल्या विविध रस्ते विकास कामांचा वेग वाढवा, तसेच मुंबई-नाशिक महामार्गावरील शक्य तेवढी कामे मान्सूनआधी पूर्ण करावीत, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

एमएसआरडीसीच्या वतीने राज्यात सुरू असलेल्या राज्यातील विविध विकास प्रकल्पांचा त्यांनी आढावा घेतला. ही सर्व कामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण व्हावीत अशी अपेक्षा उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली. बैठकीस एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड आणि अधिकारी उपस्थित होते.

मुंबई - नाशिक महामार्गाचा आढावा घेऊन महामार्गावरील रखडलेल्या कामांना गती देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. मान्सूनपूर्वी ज्या रस्त्याचे काँक्रीटीकरण पूर्ण होणार नाही त्याचे डांबरीकरण करून रस्ता वाहतूक करण्यास योग्य बनवावा, या मार्गावरील ३१ किलोमीटरचे काँक्रीटीकरण होणे अद्यापही बाकी आहे, तसेच पिंपळास चारोटी, रेल्वे ओव्हर ब्रिज येथील काम रखडले आहे या कामांना तत्काळ गती द्यावी, कंत्राटदार ही कामे वेळेत पूर्ण करण्यास हयगय करत असल्यास त्यालाही नोटीस पाठवून ताकीद द्यावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

#### कामात हयगय करणारे अधिकारी आणि कंत्राटदार यांच्यावर कठोर कारवाई करणार

रेल्वे पुलाच्या कामासाठी गर्डर आल्यानंतर तत्काळ रेल्वेकडून मेगाब्लॉक मागून घ्यावा आणि हे काम येत्या महिन्याभरात पूर्ण करावे. या महामार्गावरील कशेळी येथील खाडीवरील पुलाचे काम ऑक्टोबरपर्यंत तर कळवा येथील खाडी पुलाचे काम जूनअखेर पूर्ण होणार आहे. येत्या पावसाळ्यात ठाणे-नाशिक महामार्गावरील वाहतूक सुरळीत व्हायला हवी, असे स्पष्ट निर्देश त्यांनी यावेळी दिले.

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाची मिसिंग लिंक डिसेंबर अखेर होणार पूर्ण

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील मिसिंग लिंकच्या कामातील सर्वात अवघड असलेले व्हर्टिकल ब्रिजचे काम सध्या सुरू आहे. हे काम अत्यंत अवघड असल्याने ते नियोजनबद्धरित्या पूर्ण करावे असे त्यांनी सांगितले. तसेच हे काम येत्या डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण होणार असून त्यानंतर तो प्रवाशांसाठी खुला होईल.

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेता हा महामार्ग सहा ऐवजी दहा मार्गिकांचा करण्याचा प्रस्ताव एमएसआरडीसीच्या विचाराधीन असून फिरायला जाणाऱ्या लोकांना दिलासा देण्यासाठी हे काम करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.



पुणे रिंगरोडच्या कामात बाधित होणाऱ्या १० हजार झाडांचे पुनर्रोपण करणार

पुणे रिंगरोडचे कामही सुरू झाले असून, यात एकूण १२ पेकेजेस आहेत. यातील नऊ पेकेजेसची कामे सुरू झाली आहेत. या रिंग रोडच्या कामात बाधित होणाऱ्या दहा हजार झाडांचे पुनर्रोपण होणार आहे. यातील चार हजार झाडांचे पुनर्रोपण यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहे.

नवीन एक्सेस कंट्रोल रस्त्यामुळे कोकणचा कायापालट

कोकणात सुरू असलेल्या रेवस रेड्डी सागरी महामार्गावर नऊ ठिकाणी खाडीवर पूल उभारण्याचे काम सुरू आहे. यात रेवस-कारंजा, रेवदंडा, आगरदांडा, केळशी, काळबादेवी, दाभोळ, जयगड अशा खाडीपुलांचा समावेश आहे. यातील काही पुलांची कामे प्रगतीपथावर असून या कामांची गती वाढवावी, असे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

तसेच कोकणात प्रस्तावित असलेल्या कोकण द्रुतगती एक्सेस कंट्रोल महामार्गाच्या कामाला गती देण्यात यावी, असे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. या महामार्गामुळे मुंबई आणि सिंधुदुर्ग हे अधिक जवळ येतील तसेच कोकणात जलद पोहोचणे शक्य होईल.

कोकणातील निवारा केंद्राच्या कामांचा वेग वाढवावा

कोकणात वारंवार येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीवेळी नागरिकांच्या तात्पुरत्या निवाऱ्यांची सोय व्हावी. यासाठी एमएसआरडीसीच्या वतीने ८६ निवारा केंद्रे उभारण्यात येणार होती. यातील ३७ निवारा केंद्राचे काम प्रगतीपथावर असून या कामांना वेग देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. तसेच शक्यतो शाळांच्या जवळ ही निवारा केंद्र उभारावीत जेणेकरून पावसाळ्यानंतर शाळांना त्यांचे उपक्रम राबवण्यासाठीही निवारा केंद्रे वापरता येतील, असे त्यांनी सांगितले.

नवीन महाबळेश्वरच्या कामाला गती द्यावी

महाबळेश्वरच्या पायथ्याला नवीन महाबळेश्वर विकसित करण्याचे काम एमएसआरडीसीने हाती घेतले असून तिथे सुरू असलेल्या कामांचा आज आढावा घेतला. यात आधी २३५ तर आता २९४ गावे नव्याने समाविष्ट करण्यात आलेली आहेत. याठिकाणी तापोळा येथील उत्तेश्वराच्या मंदिराचे काम, उत्तेश्वर रोप वेचे काम याचीही प्रगती जाणून घेतली. तसेच या कामांची गती वाढवण्यास त्यांनी सांगितले.

एमएसआरडीसीला शासनाने अनेक प्रकल्प शासनाने दिले असून ते दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्याकडे लक्ष द्यावे, तसेच सिडको, एमएमआरडीएप्रमाणे झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पात सहभागी व्हावे असे त्यांनी सांगितले. एमएसआरडीसीची कामे ज्याठिकाणी सुरू आहेत तिथे राडारोडा दूर करून बॅरिकेड्स बसवावेत. पुलाखाली उत्तम झाडे लावून सुशोभीकरण करावे. तसेच पावसाळ्यापूर्वी करायच्या कामांना प्राधान्य देऊन ती सर्व कामे वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश उपमुख्यमंत्री शिंदे यांनी या बैठकीत दिले.

## संपादकीय....

# अनुदान लाटले

शासनाने योजनेसंदर्भात आता कठोर भूमिका घेतली आहे. लाभार्थी महिलांच्या अर्जाची पडताळणी करण्यात येत आहे. ज्या महिला या योजनेच्या निकषांत बसत नाहीत, त्यांना योजनेतून वगळण्यात येत आहे. अनेक महिलांचे उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा जास्त आहे. तसेच नावावर घर आणि चारचाकी वाहन असून देखील काही महिलांनी या योजनेचा लाभ घेतल्याचे आढळून आले, जे निकषांविरोधात आहे. धक्कादायक म्हणजे, सरकारी कर्मचारी असलेल्या महिला देखील या योजनेच्या लाभार्थी आहेत. अशा महिलांना योजनेतून वगळण्यात येणार आहे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा महाराष्ट्रातील लाखो महिलांना लाभ मिळत आहे. राज्य सरकारने कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न कमी असणाऱ्या महिलांना लाभ देण्यासाठी लाडकी बहीण योजना सुरु केली होती. या योजनेअंतर्गत सरकारकडून महिलांना दर महिन्याला हजार रुपये धनलाभ दिला जातो. पण यामध्ये निकषात न बसणाऱ्या महिलांनी सुद्धा धनलाभ घेतल्याचे समोर आले आहे. यासंदर्भात शासनाने आता मोठा निर्णय घेतला आहे. अर्जांची पुन्हा पडताळणी करुन निकषात न बसणाऱ्या महिलांना योजनेतून वगळण्याच निर्णय शासनाने घेतला आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीतही पडताळणीची प्रक्रिया राबवली जात आहे. या प्रक्रियेत सेवार्थ मधील जवळपास २ लाख अर्जांची पडताळणी केल्यानंतर त्यात सुमारे २२८९ सरकारी कर्मचाऱ्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी नाव नोंदणी केल्याची बाब लक्षात आली आहे.

# प्रजाजनासाठी धडपडणाऱ्या अहिल्यादेवी

अहिल्यादेवी स्वातँय भारतातील, माळव्याच्या तत्त्वज्ञानी महाराणी म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी नर्मदा तीरी, इंदूरच्या दक्षिणेस असलेल्या महेश्वर या ठिकाणी आपली राजधानी हलविली. मृत्युपर्यंत त्या तिथेच वास्तव्यात होत्या. मल्हाररावांनी त्यांना आधीच प्रशासकीय व सैन्याच्या कामात पारंगत केल्यामुळे त्या धाडसी बनल्या होत्या. त्यामुळे त्या

लढाईत स्वतः सैन्याचे नेतृत्व करीत होत्या. पुढे त्यांनी तुकोजीराव होळकर यांची सेनापती म्हणून नेमणूक केली.

अहिल्याबाईंचे पती खंडेराव होळकर कुम्हटेच्या लढाईत मृत्यु पावल्यानंतर त्याकाळी सती जाण्याची प्रथा अस्तित्वात होती. परंतु सासरे मल्हारराव होळकर यांनी विरोध केला. साम्राज्याचा कारभार सांभाळावा असे त्यांनी सुचविले. माळवा प्रांताचा कारभार बघत असतांना सासरे मल्हारराव होळकर यांचे देखील दु:खद निधन झाले. १७६५ मध्ये सत्तेसाठी झालेल्या एका लढाई दरम्यान लिहिलेल्या एका पत्रावरून मल्हाररावांचा अहिल्याबाईंच्या कर्तृत्वावर किती विश्वास होता हे दिसून येते. चंबळ पार करून ग्वाल्हेर येथे जावा, तेथे तुम्ही ४-५ दिवस मुक्काम करू शकता. तुम्ही मोठे सैन्य ठेवू शकता व त्यांच्या शस्त्रांसाठी योग्य तजवीज करा.....कूच करतांना, मार्गावर तुम्ही सुरक्षेसाठी चौक्या लावा

पूर्वीच शासक म्हणून तरबेज झाल्यामुळे, मल्हारराव व मुलाच्या मृत्यूनंतर, अहिल्यादेवींनी स्वतःलाच राज्य कारभार पाहू देण्याची अनुज्ञा द्यावी अशी पेशव्यांना विनंती केली. त्यांनी शासन करण्यास माळव्यात अनेकांचा विरोध होता, पण होळकरांचे सैन्य अहिल्याबाईंच्या नेतृत्वाखाली काम करण्यास उत्सुक होते. अहिल्यादेवी सैनिकी कवायतीत हत्तीच्या हौद्याच्या कोपऱ्यात चार धनुष्य आणि बाणांचे भाते ठेवत असत, असे म्हणतात.

अहिल्यादेवी एक अतिशय योग्य शासक व संघटक होत्या. मध्य भारताच्या इंदूरमधील त्यांचा राज्यकाळ सुमारे तीस वर्षे चालला, तो एक स्वप्नवत काळ होता. या काळात कायद्याचे राज्य होते आणि त्यामुळे त्या काळात जनतेची भरभराट झाली. ज्याप्रमाणे शिवाजी महाराज हे जसे पुरुषांमधले उत्तम राजे होते, तसेच अहिल्यादेवी ही स्त्रियांमधील उत्तम राज्यकर्ती होती. तिच्या चांगल्या बुध्दिचे, चांगुलपणाचे व गुणांचे उदाहरण देता येऊ शकते. अशी अहिल्यादेवी ही एक महान स्त्री होती.

आपल्या असामान्य कर्तृत्वाने अहिल्यादेवींनी रयतेचे मन जिंकले. नाना फडणवीसांसकट अनेक उच्च धुरीण आणि माळव्यातील लोकांनुसार ती एक दिव्य अवतार होती. ती आजतागायतची सर्वांत शुद्ध व उदाहरण देण्याजोगी शासक होती. अलीकडच्या काळातील चरित्रकार अहिल्यादेवींना तत्त्वज्ञानी राणी असे संबोधतात. याचा संदर्भ बहुतेक तत्त्वज्ञानी राजा भोज यांच्याशी असावा.

अहिल्यादेवी होळकर ह्या एक खरोखरीच विस्तृत राजकीय दृश्यपटलाच्या एक सूक्ष्म अवलोकनकर्त्या होत्या. १७७२ मध्ये पेशव्यांना लिहिलेल्या एका पत्रात त्यांनी ब्रिटिशांबरोबर हातमिळवणी करण्याबाबत एक ताकीद दिली होती. त्यांना कवटाळणे हे अस्वलास कवटाळण्याजोगे असल्याचे त्यांनी नोंदले आहे. वाघासारखे इतर प्राणी हे शक्ती व युक्तीने मारले जाऊ शकतात, परंतु अस्वल मारणे हे फारच कठीण असते. सरळ त्याच्या चेहऱ्यावर वार केल्यावरच ते मरते. एकदा त्याच्या मजबूत पकडीत सापडल्यावर ते त्याच्या शिकारीस, गुदगुल्या करून ठार मारते, असाच इंग्रजांचा मार्ग आहे. हे बघता, त्यांच्यावर मात करणे कठीण आहे.

भिल्ल व गोंड या राज्याच्या सीमेवर असलेल्या जमातींमधील वाद अहिल्यादेवी सोडवू शकल्या नाहीत. तरीही त्यांनी त्या लोकांना पहाडातील निरुपयोगी जमीन दिली आणि त्यांना, त्या क्षेत्रातून जाणाऱ्या सामानावर थोडा 'कर' घेण्याचा अधिकार दिला. यासाठी रायगंण सुभ्यावर नवापुर या



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

ठिकाणी ठिंगळे भिल्ल सरदार यांना नेमले. त्यामुळे भिल्ल जमाती होळकराच्या सैन्यात आले व त्यांनी सुरते वर वचक बसवला. याही बाबतीत, (आंग्ल लेखक) माल्कम यांच्यानुसार, अहिल्यादेवींनी त्यांच्या सवयींवर लक्ष ठेवले.

एकोणीसाव्या व विसाव्या शतकातील भारतीय, इंग्रजी व अमेरिकन इतिहासकार हे मान्य करतात की, अहिल्यादेवी होळकरांस माळवा व महाराष्ट्रात, त्याकाळी व आताही, संताचा सन्मान दिला जातो. इतिहासाच्या कोणाही अभ्यासकास ते मत खोडून काढण्याजोगे आजवर काहीही सापडलेले नाही. राजकारणातील बारकावे व तत्त्व व्यावहारिक नीती नियम व सूत्रे आपल्या देशाची राजकीय, सामाजिक, भौगोलिक स्थिती, रणांगणावरील आखाडे व अडचणी आणि बारकावे समजून घेतले. मल्हारराव यांच्या गैरहजेरीत सर्व कारभार करण्यात त्या पारंगत झाल्या. शेतकरी सुखी तर जग सुखी या संकल्पनेतून शेतकऱ्यांच्या जाचक करातून मुक्त केले. अनेक ठिकाणी तलाव व विहिरी बांधल्या. शेतकऱ्यांना गोपालनाचे महत्त्व पटवून प्रजेला गाई देऊन मोठ्या प्रमाणात गोपालन घडवून आणले.

मातोश्रीची लोककल्याणाची कीर्ती ख्याती ऐकुन अनेक विद्वान लोक त्यांची भेट घेण्यास येत असत आणि नंतर त्या ठिकाणीच राहत असत. अनेक विषयाचे विद्वान, शास्त्री पंडीत, व्याकरणकार, कीर्तनकार, ज्योतिषी, पुजारी, वैद्य, हकीम यांनाही त्या मुद्दाम बोलावून घेऊन त्यांना त्या राजाश्रय देत असत. महेश्वर नगरीत वास्तव करीत होते म्हणूनच महेश्वर नगरी त्याकाळी संस्कृती विद्वान व धर्माचे माहेरघर म्हणून नावारूपाला आली होती. ग्रंथ संपदा- निर्मिती छापखाने नसल्याने त्याकाळी धर्माचे तत्त्वज्ञान जाणून घेण्याकरिता हस्तलिखिते वरच अवलंबून राहावे लागत होते. हस्तलिखिते लिहिणारे मोठ्या प्रमाणात रकमेची मागणी करत असत. ज्याप्रमाणे हिरा व रत्ने पारखणाऱ्या जवाहिऱ्याप्रमाणे त्या विद्द्येची महत्त्व जाणत असल्याने त्यांच्या मागणीप्रमाणे रक्कम देऊन ग्रंथाची हस्तलिखिते तयार करून विद्वान विद्यार्थ्यांसाठी अनमोल ग्रंथसंपदा निर्माण करून जतन केली. शाळा काढून विद्याप्रसाराचे काम केले.

या काळात सती जाण्याची मोठी रूढी व परंपरा होती. सती गेल्याने पुण्य व न गेल्याने पाप असा समज समाजात रूढ होता. रामायण आणि महाभारत यामध्ये अनेक युद्ध होऊनही कोणी सती गेल्याचा उल्लेख नाहीत असे अनेक दाखले देऊन सती प्रथेला शास्त्राचा आधार नाही हे प्रजेला पटवून दिले. कालांतराने १८२९ साली राजाराम मोहन रॉय यांचा प्रयत्नामुळे सतीची अनिष्ट प्रथा कायद्याने बंद करण्यात



आली यावरून अहिल्याबाई होळकर यांच्या दूरदृष्टतेची प्रचीती आपणांस येते. त्याकाळी प्रवास करणाऱ्या प्रवाशांना व प्रजेची चोर दरोडेखोर व भिल्ल लुटमार करीत असत अशा लुटारू लोकांना ठिंगळे सरदारांमार्फत सैन्यात सामील करून पाळीव पशु व गायी, म्हशी आणि शेत जमीनी दिल्या व त्यांचे मत परिवर्तन केले व ते लोक शेती करू लागले त्यामुळे त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटला. भिल्ल लोकांना भिलकवाडी कर घेण्याची परवानगी दिली. एवढे करूनही प्रजेला त्रस्त करणाऱ्या या लोकांना त्यांनी तोफेच्या तोंडी देऊन एक प्रकारचा दरारा नर्माण केला.

अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले, यवढेच नाही तर त्यांनी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक धोरण आखलं प्रसिंध्द हिंदू मंदिराचा त्यांनी जीर्णोद्धार केला; महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यात द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. वेरावळ येथील सोमनाथचे गझनीच्या महंमदाने ध्वस्त केलेले देऊळ बघून अहिल्यादेवींनी शेजारीच शंकराचे एक देऊळ बांधले. सोमनाथला जाणारे लोकं या देवळालाही भेट देतात. अहिल्याबाईंना प्रजेसाठी कल्याणकारी असे काम करण्याची आवड होती. अहिल्याबाई होळकर यांच्या न्यायप्रियतेची ख्याती सर्व दूर पसरली होती. सर्वांना समान न्याय हा त्यांचा बाणा होता. त्यांच्या संस्थानचा सुभेदार तुकोजीराव होळकर यांच्या मुलाने प्रजेला त्रास दिला म्हणून त्याला तुरुंगात डांबले. तर अहिल्यादेवीच्या सर्वांना समान न्याय या विचाराने डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सुद्धा प्रभावित होते.

पेशव्यांनी परवानगी दिल्यावर, ज्या माणसाने तिला विरोध केला होता, त्यास चाकरीत घेऊन तुकोजीराव होळकर (मल्हाररावांचा दत्तक पुत्र) यास सैन्याचा मुख्य करून, अहिल्यादेवी होळकरांनी पूर्ण दिमाखात माळव्यास प्रयाण केले. अहिल्यादेवींनी पडदा प्रथा कधीच पाळली नाही. त्या रोज जनतेचा दरबार भरवीत असत व लोकांची गाऱ्हाणी ऐकण्यास नेहमीच उपलब्ध असत. भारतीय संस्कृती कोषात अहिल्यादेवीनी केलेल्या बांधकामांची यादी आहे – काशी, गया, सोमनाथ,अयोध्या, मथुरा, हरिद्वार, कांची, अवंती, द्वारका, बद्रीकेदार, रामेश्वर व जगन्नाथपुरी वगैरे. अहिल्यादेवींस, सावकार, व्यापारी, शेतकरी इत्यादी आर्थिकदृष्ट्या सुदृढ झालेले बघून आनंद होत असे. परंतु त्यांनी त्यांच्यावर आपला अधिकार असल्याचे कधीच जाणवू दिले नाही. त्यांनी सर्व राज्यकारभार हा सुखी व धनाढ्य लोकांकडून नियमांतर्गत मिळालेल्या धनापासून चालविला होता, असे दिसते.

अहिल्यादेवींनी जनतेच्या/रयतेच्या काळजीपोटी अनेक गोष्टी केल्या. त्यांनी अनेक विधवांना पतीची मिळकत त्यांच्यापाशीच ठेवण्यात मदत केली. त्यांच्या राज्यात कोणीही विधवा मुलाला दत्तक घेऊ शकत असे. एकदा त्यांच्या एका मंत्र्याने लाच घेतल्याशिवाय दत्तक घेण्याचा मंजुरीस नकार दिला, तेव्हा अहिल्यादेवींनी दत्तक विधानाचा कार्यक्रम स्वतः आयोजित करून, रीतसर कपडे व दागिन्यांचा अहेर दिला.

अहिल्यादेवींच्या सन्मानाप्रित्यर्थ व स्मृतिप्रित्यर्थ भारत सरकारने २५ ऑगस्ट १९९६ रोजी एक टपाल तिकिट जारी केले. या अशा शासनकर्तीस मानवंदना म्हणून इंदूरच्या विमानतळाचे नाव देवी अहिल्याबाई विमानतळ असे ठेवण्यात आले आहे. तसेच, इंदूर विद्यापीठास देवी अहिल्या विश्वविद्यालय असे नांव देण्यात आले आहे. इंदूर शहराला सर्व सोयीने उपयुक्त प्रगतिशील असे शहर बनविले. महाराष्ट्रातील सोलापूर विद्यापीठाचे नवीन नाव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ ठेवण्यात आले आहे. १९९६ मध्ये, इंदुरातील नागरिकांनी त्यांच्या नावाने अहिल्यादेवी स्मृतीस अभिवादन म्हणुन पुरस्कार सुरू केला. तो, दरवर्षी, जनसेवेचे विशेष काम करणाऱ्यास दिला जातो. भारताच्या पंतप्रधानांनी पहिल्या वर्षी तो पुरस्कार महान समाजधुरिण नानाजी देशमुखांना दिला.

अशा सोज्वळ, न्यायप्रिय अहिल्यादेवींना इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी भारताच्या कॅथरीन द ग्रेट, एलिझाबेथ मार्गारेट असे म्हटले आहे. थोडक्यात अहिल्याबाई यांची रशियाची राणी कॅथरीन द ग्रेट, इंग्लंडची राणी एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची राणी मार्गारेट यांच्याशी तुलना केली आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, ज्या वेळेस जगातील सर्वात महान स्त्रीयांचा इतिहास लिहिला जाईल त्या वेळेस पुण्यशलोक अहिल्यादेवी होळकर यांचे नांव सर्व प्रथम लिहिले जाईल. ही त्यांच्या चांगुलपणाची पावती म्हणायला हरकत नाही. या इंदूरमधील शासकांनी, त्यांच्या अखत्यारीत असलेल्या सर्वांस चांगले काम करण्यास प्रोत्साहन दिले. व्यापाऱ्यांनी चांगल्या कपड्यांचे उत्पादन केले, व्यापार वाढला, शेतकरी हे शांततेत व दबावरहित होते. कोणतेही प्रकरण राणीच्या निदर्शनास आले की, ते कडकपणे हाताळले जाई. अहिल्यादेवींना आपल्या प्रजेचा उत्कर्ष आवडत असे. तसेच ती प्रजा राजा हिसकावून घेईल म्हणून आपली संपत्ती उघड करण्यास घाबरत नाही, हे बघणे आवडत असे. दूरदूरपर्यंत, रस्त्यांच्या कडेला, दाट छायादार वृक्ष लावण्यात आले होते, विहिरी केल्या होत्या, पथिकांसाठी विश्रांतीगृहे. गरीब, घर नसलेले व अनाथ या सर्वांना त्यांच्या जरुरीनुसार, सर्व मिळत होते. बऱ्याच काळापासून, भिल्ल लोक पहाडांतून सामानाची ने-आण करत असतांना चोर व दरोडेखोर त्यांची लूटमार करीत असत. अहिल्याबाईंनी भिल्ल लोकांना त्यापासून मुक्ती मिळवून दिली व प्रामाणिकपणे शेती करण्याची संधी त्यांना देऊ केली. सर्व समाजाला अहिल्यादेवी आवडत असत आणि तो त्यांच्या उदंड आयुष्याची प्रार्थना करीत असे.

# टाकळीवाडीच्या सुपुत्रांची गगन भरारी







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
टाकळीवाडी/प्रतिनिधी

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील एकाच वेळी तिघा सैनिकांना पदोन्नती झाली आहे. यामध्ये विजय श्रीपाल बदामे यांची सुभेदार मेजर पदी निवड, तर अमोल आप्पासो वनकोरे याची नायब सुभेदार पदी निवड, अजय पारीसा काणे यांची सी.आर.पी.एफ. उपनिरीक्षक पदी निवड झाली आहे.

एकाच वेळी यांना पदोन्नती झाल्याबद्दल समस्त गावकरी कौतुक करत आहेत. यांना शुभेच्छा सर्व आजी-माजी सैनिक, सर्व ग्रामस्थ, सैनिक वेल्फेअर असोसिएशन टाकळीवाडी यांच्यावतीने शुभेच्छा देण्यात आल्या.

# आठगांव विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय कोनगांवमाजी विद्यार्थी स्नेह संमेलन मेळावा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
कोनगांव : आठगांव विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय कोनगांव माजी विद्यार्थी स्नेह संमेलन मेळावा (गेट टूगेदर) दहावी बॅच २००५-०६ रविवार दि.२५ मे २०२५ रोजी मोठ्या उत्सवाने पार पाडला या कार्यक्रमाने खूप जणांची मनं जिंकली... विशेषतः या कार्यक्रमा मध्ये पाहिल्यानंदाच विद्यमान शिक्षक व माजी शिक्षक हे मोठ्या प्रमाणात एकत्र आले...या कार्यक्रमाची रूपरेषा खूप छान होती. या कार्यक्रमाला विशेष आकर्षित केले ते होम मिनिस्टर या कार्यक्रमाने. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी (मुख्याध्यापक )श्री. के. के. म्हात्रे, (उपमुख्याध्यापक) श्री.डॉ. एस. एच. नागावकर व (पर्यवेक्षक) श्री.एस. साळुंके सर होते.... हा कार्यक्रम पार जरी पडला असेल तरी या कार्यक्रमाची तयारी ही १ महिन्या आधीपासून माजी विद्यार्थी दर्शन पाटील यांच्या परिश्रमामुळे व चांगल्या नियोजनामुळे सर्वांना अनुभवयाला मिळाला.

तसेच त्यांचे सहकारी या कार्यक्रमामध्ये सक्रिय असलेले माजी विद्यार्थी भूषण पाटील, सचिन म्हात्रे, जितेंद्र जाधव, संदेश पाटील, सुमित चौधरी, सागर पाटील, जयेश शेलार, प्राजक्ता कराळे, सुचित्रा मुकादम, दिपाली नाईक, वृषाली, हिमांशू म्हात्रे, भूषण ननावरे, सिद्धांत निकाळे, संग्राम बचुट.

## संत नामदेव ६७५ वा समाधी सोहळा कार्यक्रम

गणेश उंडाळे यांची माहिती

# शासनाकडून सर्वतोपरी सहकार्य करू : पालकमंत्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी : तीर्थक्षेत्र पंढरी नगरीत दि. २३ व २४ जुलै रोजी साजर्या होत असलेल्या संत नामदेव महाराज व परिवाराच्या ६७५ व्या संजीवन समाधी सोहळा कार्यक्रम होणार असून यासाठी शासनाकडून सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले असल्याची माहिती एकसंघाचे प्रदेशाध्यक्ष तथा समस्त नामदेव शिंपी समाज पंढरपूरचे अध्यक्ष गणेश उंडाळे यांनी दिली.



बुधवार दि. २८ मे रोजी अ. भा. संत नामदेव क्षत्रिय एकसंघाच्या शिष्टमंडळाने ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांची मुंबई येथे सह्याद्री अतिथीगृहात भेट घेतली. यावेळी पंढरीत भक्तीसागर येथे उभारण्यात येणार्या संत नामदेव महाराज राष्ट्रीय स्मारक तसेच ६७५ व्या संजीवन समाधी सोहळा कार्यक्रमाबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली. दरम्यान यावेळी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष ह.भ.प. गहिणीनाथ महाराज औसेकर आर्वर्जुन उपस्थित होते.

यावेळी संत नामदेव महाराजांचे वंशज ह. भ. प. निवृत्ती महाराज नामदास, एकसंघाचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. महेश ढवळे, एकसंघाचे राष्ट्रीय सचिव तथा केशवराज संस्थेचे प्रमुख रुपेश खांडके, उपाध्यक्ष धनंजय गोंदकर, प्रदेशाध्यक्ष गणेश उंडाळे, प्रभु सोनवणे, शासकीय स्वीय सहाय्यक वैभव सदावर्ते आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# राष्ट्रवादी नेते रमझान शेख यांच्या पुढाकाराने रस्त्यावरील दिव्यांचा प्रश्न मार्गी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
ठाणे/प्रतिनिधी : अवकाळी झालेल्या पावसामुळे खारघर येथील फरशीपाडा सेक्टर ३४ ए, ३४ बी येथील रस्त्यावरील दिवे निकामी झाले होते. २-३ दिवस नागरिकांना रस्त्यावर अंधार सोसावा लागत असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे नेते रमझान शेख यांच्या लक्षात येताच तत्काळ रात्रीच महाराष्ट्र राज्य वीज मंडळ, खारघर कार्यालयात संपर्क साधून विजेची समस्या सोडवण्यासाठी आव्हान केले.

लोकांची होणारी गैर सोय लक्षात येताच जास्त वेळ वाया न घालवता महाराष्ट्र राज्य वीज मंडळ, खारघर मधील इलेक्ट्रिशियन श्री संजू पाटील आणि गणेश पाटील लगेच जागेवर येऊन रस्त्यावरील दिव्यांचा दोष शोधून दिवे चालू करून दिले.



यावेळी समाजसेवक श्री. समीर शेख देखील मदतीस उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य वीज मंडळ, खारघर यांनी वेळ वाया न घालवतात तात्काळ सहकार्य करून रस्त्यावरील दिवे चालू करून देण्यास जी तत्परता दाखवली त्याबद्दल रमझान शेख यांनी त्यांचे आभार मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# एक जिल्हा एक नोंदणी मोहिमेची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे; नक्शा उपक्रमा अंतर्गत पंढरपूर हा पायलट प्रोजेक्ट असून हा उपक्रम राज्यात लागू करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, दिनांक २९(जिमाका):- जिल्ह्यातील नागरिकांना नोंदणी व मुद्रांक विभागाच्या वतीने जिल्ह्याच्या कोणत्याही भागातून एक जिल्हा एक नोंदणी मोहिमे अंतर्गत उपनिबंधक कार्यालयात नोंदणी करता येणार आहे. याच योजनेच्या अनुषंगाने पुढील काळात शासन संपूर्ण राज्यासाठी 'एक राज्य एक नोंदणी' हा उपक्रम सुरू करणार असल्याची माहिती राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

नियोजन समितीच्या सभागृह येथे आयोजित नोंदणी व मुद्रांक तसेच भूमी अभिलेख विभागाच्या जिल्हा आढावा बैठकीत महसूल मंत्री बावनकुळे मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आमदार सर्वश्री समाधान आवताडे, देवेंद्र कोठे, उत्तम जानकर, रणजीत सिंह मोहिते पाटील, राजू खरे, अभिजीत पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, उपजिल्हाधिकारी महसूल संतोषकुमार देशमुख, सह जिल्हा निबंधक श्री. खोमणे, जिल्हा भूमी अभिलेख अधिक्षक सचिन भंवर, यांच्यासह नोंदणी व मुद्रांक विभागाचे तसेच भूमी अभिलेख विभागाचे तालुकास्तरीय अधिकारी उपस्थित होते.

एक जिल्हा एक नोंदणी अंतर्गत जिल्ह्याच्या कोणत्याही भागा-तून नागरिकांना आपल्या प्रॉपर्टीची नोंदणी करता येते. आज रोजी पर्यंत जिल्ह्यातील सहाशे दोन नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घेतला असून जास्तीत जास्त नागरिकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे. तसेच मंत्रिमंडळाने ५०० रुपयात शेतकऱ्यांचे जमीन वाटपाची नोंदणी करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याचीही जिल्ह्यात योग्य अंमलबजावणी करावी. नोंदणी व मुद्रांक कार्यालयाकडे जिल्हाधिकारी यांनी लक्ष द्यावे तसेच प्रत्येक महिन्यातून या कार्यालयाची एक बैठक घेऊन त्यांनी केलेल्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेऊन या अंतर्गत नागरिकांना योग्य सुविधा उपलब्ध होतात का याबाबत खात्री करावी अश्या सूचना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या.




नोंदणी व मुद्रांक कार्यालयाने शासनाची भूमिका लक्षात घेऊन आपल्या कामात सुधारणा कराव्यात तसेच नागरिकांच्या दस्त नोंदणी प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची गडबड होणार नाही याची काळजी घ्यावी. सर्वसामान्यांची अडवणूक होण-ार नाही या अनुषंगाने उपाययोजना कराव्यात असेही निर्देश महसूल मंत्री श्री बावनकुळे यांनी दिले.

प्रारंभी सह जिल्हा निबंधक श्री. खोमणे यांनी नोंदणी व मुद्रांक विभागाच्या वतीने जिल्ह्यात करण्यात येत असलेल्या कामकाजाची माहिती दिली.

**स्वामीत्व योजना टप्पा २ अंतर्गत गावठाणाबाहेरील घरांची मोजणी करण्यात येणार : चंद्रशेखर बावनकुळे**

केंद्र शासनाच्या स्वामीत्व योजना टप्पा एक अंतर्गत द्रोणद्वारे गावा-तील घराची मोजणी करण्यात येत आहे यातील बहुतांश काम पूर्ण झा-लेले असून प्रत्येक गावात गावठाणा बाहेर असलेल्या घरांची मोजणी करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने स्वामीत्व योजना टप्पा क्रमांक दोन सुरू करण्यात येणार आहे. तरी या अनुषंगाने भूमी अभिलेख विभागाने गावठाणा बाहेरील घरांची मोजणी करण्याच्या अनुषंगाने माहिती तयार ठेवावी, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

केंद्र शासनाच्या नक्शा उपक्रमांतर्गत राज्यातील दहा शहरांचा समावेश असून त्यापैकी पंढरपूर हे एक शहर आहे. भूमी अभिलेख विभागाने पंढरपूर नगरपालिकेच्या हद्दीतील सर्व घरांची ड्रोन द्वारे मोजणी करून प्रॉपर्टी कार्ड तयार करून ठेवावे. पंढरपूर येथील काम हे एक पायलट प्रोजेक्ट म्हणून करावे व हाच उपक्रम पुढे राज्यासाठी लागू करण्यात येईल, असेही श्री. बावनकुळे यांनी सांगितले. भूमी अभिलेख विभागाने अत्यंत पारदर्शकपणे काम करावे सर्वसामान्य नागरिकांच्या या विभागाविषयी खूप तक्रारी आहेत त्या तक्रारी येणार नाहीत या अनुषंगाने कार्यपद्धतीत बदल करावा असेही त्यांनी निर्देशित केले.

राज्य मंत्रिमंडळाने नुकताच पोट हिस्सा मोजणीसाठी शेतकऱ्याकडून फक्त दोनशे रुपये घेण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे त्या अनुषंगाने जिल्ह्यात त्याची प्रभावीपणे अंमलबजवणी करावी. सर्व मोजणी प्रकरणे तात्काळ निकाली काढावेत. आपल्या तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी संबंधित आमदार यांच्याशी संपर्क करून त्यांना विभागाच्या वतीने करण्यात येत असलेल्या कामकाजाची माहिती दर तीन महिन्याला द्यावी असेही महसूल मंत्री बावनकुळे यांनी सुचित केले.

प्रारंभी जिल्हा भूमी अभिलेख अधिक्षक सचिन भंवर यांनी विभागाच्या वतीने सोलापूर जिल्ह्यात करण्यात येत असलेल्या कामकाजाची माहिती दिली. यामध्ये स्वामीत्व योजना अंतर्गत ड्रोनद्वारे ६४३ गा-वाची मोजणी पूर्ण करण्यात आल्याचे सांगितले. काही गावांचा विरोध होता परंतु समुपदेशन करून बहुतांश गावांचे ड्रोन फ्लाय पूर्ण झालेले आहे असे सांगून भूमी अभिलेख विभागाच्या वतीने पारदर्शकपणे कारभार करून लोकाभिमुख प्रशासन देण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्यात येतील असे सांगितले.

# पावसामुळे सारणी गावातील लोकवस्त्यांमध्ये शिरले पाणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव

औसा (सारणी)घरात शिरले गुडघ्याएवढे पाणी झाल्याने बहुतांश नागरिकांनी मुलाबाळांसह रात्र जागून काढली. सकाळी घरातील पाणी बाहेर काढण्यात लोकांचा वेळ गेला. या

गावातील अनेक भागांमध्ये लोक घरातील पाणी बाहेर काढून टाकत हो-ते. मात्र, पाऊस सुरू असल्याने ते कमी होत नव्हते. उशिरापर्यंत पाऊस सुरू असल्याने लोकांनी रात्र जागून काढली. सकाळी हळूहळू पाण्याचा निचरा होऊ लागल्यानंतर नागरिकांनी घरातील पाणी उपसण्यास सुरुवात केली. संसारोपयोगी साहित्य, धान्य व कपडे भिजून चिंब झाले होते. घरातील वृद्ध लोकांना नाहक त्रास सहन करावा लागला. परिसरातील नाल्यात पाणी तुंबल्याने स्थानिक नागरिकांची बिकट अवस्था झाली. हातावरचं पोट असलेल्या महिला पुरुषांनी रोजगार टाळून घर स्वच्छ व नीटनेटके करण्यात दिवस घालवला. घरावरील पत्रे गळू लागल्याने सकाळी अनेकांनी प्लास्टिक लावून घेतले.

अनेक नागरिकांच्या घरामध्ये रात्रभर पावसाचे पाणी होते. त्यामुळे भिंतींना ओल आली आहे. मुसळधार पावसामुळे मुळे स्थानिक लोकांच्या घरांमध्ये पाणी शिरले होते, अशी माहिती स्थानिक नागरिकांनी दिली.

नवीन सारणी ते सारणी भाग २ हा एकच रस्ता असल्याने नागरिकांचा नाइलाज होतो.गेल्या अनेक वर्षांपासून हा धोका स्थानिक नागरिक प्रत्येक पावसाळ्यात अनुभवत आहेत. स्थानिक विद्यार्थ्यांना याच ठिकाणावरून शाळेला जावे व यावे लागते.

हे पाणी गुडघ्याच्या वर होते, त्यामुळे घरातील कुटुंबीयांची तारांबळ उडाली. घरातील लोक चढावर असलेल्या ठिकाणी जाऊन बसले. पाणी पहाटेपर्यंत असेच थांबले होते. शेवटी पहाटे बाहेरील पाण्याचा हळूहळू निचरा होऊ लागला.

हे पाणी काढताना घरातील सर्व सदस्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला, पूर्ण रात्र जागून काढावी लागली. घरात पाणी आल्यामुळे गोधडी, सतरंजी, चादर भिजून गेले. त्यामुळे रात्र कुडकुडत जागून काढावी लागल्याचे नागरिकांनी सांगितले.

# महावितरण लकी डिजिटल ग्राहक योजनेत निफाडमध्ये ५ ग्राहक बक्षीसांचे मानकरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/निफाड : महावितरण कंपनी मार्फत ऑनलाइन वीज भरणाऱ्या ग्राहकांसाठी महावितरणचे मुख्य अभियंता लटपटे, अधीक्षक अभियंता थूल, कार्यकारी अभियंता काळुमाळी व महावितरण कंपनीच्या संकल्पनेनुसार निलेश नागरे व सर्व शाखा अभियंता.. यांचे मार्गदर्शनाखाली निफाड तालुक्यात ही ऑनलाईन लकी ड्रॉ योजना राबविण्यात आली असून. माहे एप्रिल २०२५ मध्ये ज्या ग्राहकांनी आपले विजबिल ऑनलाइन पद्धतीने भरले होते अशा ग्राहकांना मे महिन्यात महावितरण कडून लकी ड्रॉ मध्ये बक्षीस मिळाले आ-हेत.निफाड उपविभागातील माहे एप्रिल २०२५ मे.च्या सोडतीत ५ ग्राहकांची लकी ड्रॉ मध्ये निवड करण्यात आलेली असून त्यामध्ये

प्रथम क्रमांकाचे बक्षीस- सॅमसंग स्मार्ट फोन ०६- हेडमास्टर जिल्हा परिषद शाळा निफाड यांना मिळाले. सदर बक्षीस हे शाळेतर्फे शिक्षक प्रवीण भिका कोळी यांना देण्यात आले तर

द्वितीय क्रमांक - रेडमी स्मार्ट फोन ३८- हे बक्षीस दोन ग्राहकांना मिळाले. त्यात

१) लक्ष्मण गोविंदा शेट्टे रा.सुकेणे तसेच

२) रतन सखाराम वेताळ रा.पिंपळस यांना देण्यात आले.आहे

तृतीय क्रमांक - स्मार्ट वॉच फास्टट्रॅक फॅंटम हे दोन ग्राहकांना मिळाले. त्यात

१) धनंजय माधव सानप रा.बोकडदरे

२) पंडित सीताराम ढोमसे रा.सोनेवाडी बु. यांना मिळाले आहे

सदर बक्षीस वितरण हे निफाड उपविभागीय कार्यालय येथे दि.२९.मे.२०२५ रोजी उपकार्यकारी अभियंता निलेश नागरे यांच्या उपस्थितीत लाभार्थ्यांना वितरीत करण्यात आले.

**जगामध्ये ऑनलाईन पद्धत सगळीकडे चालू असून या ऑनलाइन वीजबिल भरणाऱ्या ग्राहकांना जेथे असेल तेथून आपले विज बिल भरता येते व विज ग्राहकांचा वेळही वाचतो महावितरण कंपनीने वीज ग्राहकांचे हित डोळ्यासमोर ठेवून ही संकल्पना मांडली असून या लकी ड्रॉ योजनेचा सर्वांनी लाभ घेतला पाहिजे सर्वांनीच ऑनलाइन बिल भरावे व बक्षीस मिळवावे असे आव्हान करीत आहे**



**– निलेश नागरे (उपकार्यकारी अभियंता निफाड)**

सदर योजनेचा शेवटचा हप्ता ३१ मे रोजी संपणार असून जे वीजबील ग्राहक दि.३१ मे २०२५ पर्यंत ऑनलाइन पध्द-तीने आपले विजबिल भरतील अशा ग्राहकांचा माहे जुन २०२५ मध्ये लकी ड्रॉ सोडत मध्ये.. समावेश करण्यात येणार आहे आहे.तरी सर्व विजबिल ग्राहकांना आवाहन करण्यात येते कि येत्या ३१ तारखेपर्यंत आपले विजबिल ऑनलाइन पध्दतीने भरून या योजनेमध्ये सहभागी व्हावे, व बक्षीसांचे धनीव्हावे असे आवाहन करण्यात आले आहे

# निफाडला गांजा विक्री करणारा जेरबंद



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/निफाड

निफाड तालुक्यातील गाजरवाडी शिव-ारात मंगळवार दिनांक २७ मे रोजी निफाड पोलिसांनी छापा टाकून एक लाख ८५ हजार रुपये किमतीचा ९ किलो २६३ ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला असून संशयित ताब्यात घेऊन त्याचे विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

सविस्तर वृत्त असे की गाजरवाडी शिवारात एक ईसम अवैधरित्या गांजा विक्री करत असल्याची गुप्त माहिती नुस-ार उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. पालवे यांचे सूचनेनुसार व निफाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांचे मार्गदर्शनाखाली गाजरवाडी येथे शिंदे वस्ती परिसरात छापा टाकून आरोपी गिरीश शरद शिंदे वय २२ रा. गाजरवाडी ,ता. निफाड, याला ताब्यात घेतले असून त्याचे कडे ९ किलो२६३ ग्रॅम वजनाचा अंदाजे एक लाख ८५ हजार रुपये किमतीचा माल जप्त केला त्याचे विरोधात निफाड पोलीस ठाण्यात अमली पदार्थ कायदे अंतर्गत एनडीपी एस प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे ,या कामी सहा. पोलीस निरीक्षक ईश्वर पाटील पो. हवा. अनिल शेरेकर, नितीन सांगळे, कपालेश्वर ढिकले, यांचे पथकाने वरील गुन्ह्यातील अमली पदार्थ गांजा हस्तगत केला असून पुढील तपास करत आहे

# अहिल्यादेवी होळकर समाज प्रबोधन मंचच्या वतीने गुणवंतांचा गौरव सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव २०२५ निमित्त आयोजित केलेल्या चित्रकला व निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण आणि विविध क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी केलेल्या यशवंतांचा गौरव सोहळा गुरुवार दि २९ मे रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन महाराणी अहिल्यादेवी समाज प्रबोधन मंच, मुंबई आणि फ्रेंड्स फॉरेव्हर फाउंडेशन च्या वतीने करण्यात आले होते.




शहरातील व तालुक्यातील जवळ पास २२ शाळांमधून २२०० विद्यार्थी सहभागी झाले होते. चित्रकला लहान गटात प्रथम पारितोषिक रू ३०००/- लता मंगेशकर विधालयाची आधिश्वरी स्वामी, द्वितीय रू२०००/- चे संत बौधले महाराज शाळेचा समर्थ पवार तर तृतीय रू १०००/- चे बक्षीस जि प प्रशाला तांदुळवाडी च्या रेणुका पानढवळे हिने पटकावले. उत्तेजनार्थ प्रत्येकी २०० रु प्रणव डिकले, उमर तांबोळी, वैदेही लोंढे, वैभवी वाघमोडे, अक्षय गिरी, प्रिया साखरे, भक्ती सलगर यांना मिळाले.

चित्रकलेच्या मोठ्या गटात प्रथम क्रमांकाचे ३०००/-रु चे बक्षीस सावित्रीबाई फुले प्रशालेच्या अभिराज वाघमारे, द्वितीय क्रमांकाचे २०००/- रू चे लता मंगेशकर शाळेच्या समृद्धी माळी तर तृतीय क्रमांकाचे १०००/- रू चे बक्षीस विधाभवन प्रशालेच्या जान्हवी सोनवणे हिला मिळाले. उत्त-ेजनार्थ २००/- रु चे श्रेयश चोंदे, शिवम पो-ते, पृथ्वीराज पिंगळे, बतुल शेख, श्वेता कांबळे, प्रांजली झाडे, अक्षरा काळे यांना मिळाले.

निबंध स्पर्धेत प्रथम ३०००/- रू चे बक्षीस कॅन्व्हास शाळेची वैदेही जोशी, द्वितीय पारितोषिक २०००/- रु चे शारदा इंग्लिश स्कूल च्या शारदा जाधव तर तृतीय क्रमांकाचे १०००/- रु चे बक्षीस जि प प्रशाला इटकूर च्या यश कदम याला मिळाले. उत्तेजनार्थ २००/- रु प्रत्येकी सुहाना बेग, अंकिता घाटूळे, देवी मुंडे, सृष्टी इंगोले यांना मिळाले.

यावेळी शालांत प्रमाणपत्र परीक्षेत पैकीच्या पैकी मार्क्स घेणारे विधाभवन प्रशालेचे आसावरी गोसावी व कृष्णा आडसुळ यांना गौरवण्यात आले. सतत १२ वर्षे शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा १००% निकालाची परंपरा टिकविणा-या मॉडेल इंग्लिश स्कूल, नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी पवई मुंबई येथे प्रवेशीत झालेली राजनंदीनी दत्ता पवार, कळंब चे भुषण ठरलेली आशियाई ज्युनियर स्क्वॅश स्पर्धेचे नेतृत्व करणारी वसुंधरा मुकुंद नांगरे, येथील वरिष्ठ बालरोगतज्ञ व प्रयोगशील शेतकरी डॉ रामकृष्ण लोंढे यांची व्हियेतनाम शेतकरी अभ्यास दौ-यासाठी निवड झाल्याबद्दल व आर्थिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून १०० कोटी रुपये ठेविचा पल्ला पार केल्याबद्दल कै. वसंतदादा पाटील उत्कृष्ट नागरी बँक पुरस्कारासाठी निवड झाल्या बद्यल प्रियदर्शिनी अर्बन को ऑप बँकेचे अध्यक्ष श्रीधर भवर दादा व बँक मॅनेजर प्रविण शिंदे यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते अहिल्यादेवींचे स्मृतिचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे अहिल्यादेवी होळकर समाज प्रबोधन मंचाचे जिल्हाअध्यक्ष प्रा सोमनाथ लांडगे सर ( धाराशिव) आणि शिव व्याख्याते श्री खराटे सर यांनी अहिल्यादेवींच्या जिवनावर सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप संतोष घाटूळे यांनी केला. सुत्रसंचालन अशोक शिंपले सर यानी केले तर आभार प्रदर्शन नानासाहेब कवडे सरांनी केले. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी फ्रेंड्स फॉरेव्हर ग्रुप चे अध्यक्ष अतुल कवडे, सचिव डॉ अभिजित लोंढे, गोपाळ उबाळे, शंकरचंद्र खंडागळे, परमेश्वर मोरे, पिंटू कसपटे, प्रबोधन मंचाचे डॉ रामकृष्ण लोंढे, नानासाहेब कवडे, संतोष घाटूळे, पत्रकार अजित गायके, बंडु लांडगे सतिश वैद्य झेलम शिंपले, सचिन सलगर यांनी परिश्रम घेतले.

### खासदार बाळ्या मामांनी मनपा अधिकाऱ्यांना धरले धारेवर

### पालिका प्रशासनाचे धाबे दणाणले

# भिवंडीतील नालेसफाईच्या कामात हलगर्जीपणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून अवकाळी पा-वसाने मागील महिन्याभरापासून हजेरी लावली असतानाही मनपा प्रशासनाने नालेसफाईच्या कामात दिरंगाई केली असून ठेकेदारांसह मनपा अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे पावसाळ्यात शहरा-तील सखल भागात पाणी साचून शहर तुंबण्याची शक्यता निर्माण झाल्याने भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे खा-सदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी मनपा अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले.सोमवारी खासदार बाळ्या मामा यांनी तीन बत्ती येथील नालेसफाईच्या कामाचा अधिकाऱ्यांसमवेत पाहणी दौरा केला.यावेळी नालेसफाईच्या कामात प्रचंड हलगर्जीपणा झाला असल्याची बाब म्हात्रे यांनी अधिकाऱ्यांसमोर दाखवून दिली.या पाहणी दौऱ्यात स्थानिक नागरिकांनी खा. बाळ्या मामा यांच्या कडे पावसाळ्यातील नालेसफाईमुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीचे गाऱ्हाणे मांडले.विशेष म्हणजे म्हात्रे यांनी अचानक केलेल्या नाले सफाईच्या कामाच्या पाहणी दौऱ्यामुळे पालिका प्रशासनाचे चांगलेच धाबे दणाणले.



येणाऱ्या पावसात पाणी साचून नागरिकांचे नुकसान होणार आहे,परंतु याची तमा पालिका प्रशासन अधिकारी कर्मचारी यांना नाही,येथील अधिकारी व ठेकेदार मस्त असून यांच्या हलगर्जीपणामुळे जनता त्रस्त झाली आहे असा आरोप खासदार बाळ्यामामा यांनी केला असून शहरातील परिस्थिती मागील कित्येक वर्षांपासून अशीच असून नालेसफाई करणारे ठेकेदार ,पालिका कर्मचाऱ्यांच्या संगणमताने हा प्रकार होत असून यावेळेस या कामात हलगर्जीपणा झाल्यास संबंधित उपायुक्त,आरोग्य विभागाचे अधिकारी व ठेकेदार यांना जबाबदार धरून त्यांच्यावर कडक कारवाईची मागणी मी करणार आहे असा इशारा देखील खासदार खासदार बाळ्या मामा यांनी मनपा अधिकाऱ्यांना दिला.

नालेसफाईच्याया कामांचा आढावा घेतल्या नंतर म्हात्रे यांनी बुजूलाच असलेल्या भाजी मार्केट, मच्छी मार्केट मध्ये जाऊन येथील स्वच्छता व सोयी सुविधांची पाहणी केली.येथे प्रचंड अस्वच्छता असल्याने व महिलांसाठी स्वच्छता गृह नसल्याचे पाहून खासदार बाळ्या मामा यांनी आरोग्य अधिकाऱ्यांना चांगलेच खडसावत लवकरात लवकर येथे स्वच्छता करण्याचे व सोयी सुविधा देण्याचे निर्देश दिले.

# पाकव्याप्त काश्मीर भारताच्या ताब्यात घ्यावा : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

## रिपब्लिकन पक्षाच्या वतीने मुंबईत भारत जिंदाबाद यात्रा काढून सिन्दुर ऑपरेशनचा विजय साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पाकपुरस्कृत आतंकवादाचा खातमा करण्याचा निर्धार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केला असून त्यानुसार सिन्दुर ऑपरेशन द्वारे पाकव्याप्त काश्मीर मधील दहशतवाद्यांची ठिकाणे उध्वस्त करून अनेक आतंकवाद्यांना ठार करण्यात आले.पहलगाम हल्ल्याचा बदला भारताने घेतला आता त्याच निर्धाराने पाकव्याप्त काश्मीर भारताने आपल्या ताब्यात घ्यावा.पाकव्याप्त काश्मीर मूळ भारताचा अविभाज्य भाग आहे.त्यामुळे आता पाकव्याप्त काश्मीर भारताने ताब्यात घ्यावाच असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी आज केले. रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आज दादर चैत्यभूमी ते इंदुमिल पर्यंत भारत जिंदाबाद यात्रा काढण्यात आली.या यात्रेचे इंदुमिल येथे सभेत रुपांतर झाल्यानंतर ना.रामदास आठवले यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.त्यावेळी ते बोलत होते.भारत जिंदाबाद यात्रा काढून रिपब्लिकन पक्षाने आतंकवाद्यांविरुद्धच्या सिन्दुर ऑपरेशनचा भारताचा विजय साजरा केला. सिन्दुर च्या यशाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी; भारतीय सैन्याच्या तिन्ही दलांचे यावेळी अभिनंदन आणि कौतुक करण्यात आले.भारतीय सैन्याच्या शौर्याचा पराक्रमाचा आम्हाला अभिमान आहे.प्रधानमंत्री मोदींनी पहलगाम हल्ल्याचा बदला घेण्याचे जाहीर करून अत्यंत सूचक कल्पक पद्धतीने सिन्दुर ऑपरेशन नाव देऊन आतंकवाद्यांचा खातमा केला.आता पाकव्याप्त काश्मीर मधील सर्व आतंकवाद्यांचा नायनाट करण्यासाठी भारताने पाकव्यापत काश्मीर भारताच्या ताब्यात घेतलाच पाहिजे असे ना.रामदास आठवले म्हणाले.यावेळी अभिनेते शक्तिमान फेम मुकेश खन्ना ; रामदास आठवले यांच्या पत्नी सौ.सीमाताई आठवले; अभिनेत्री तृप्ती भोईर; रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे; मुंबई सरचिटणीस विवेक पवार,कार्याध्यक्ष बाळासाहेब गरुड; जिल्हा अध्यक्ष संजय डोळसे;रमेश गायकवाड; संजय पवार; गौरव शर्मा; श्रीकांत भालेराव; अमित तांबे; सचिनभाई मोहिते; रवी गायकवाड; अजित रणदिवे सोना कांबळे फुलाबाई सोनवणे अशा लांडगे अभया सोनवणे स्वप्नाली जाधव रत्ना शिंदे संजय खंडागळे राजाभाऊ गांगुर्डे आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

रिपब्लिकन पक्षाच्या भारत जिंदाबाद यात्रेत हजारो नागरिक तिरंगा झेंडा घेऊन सहभागी झाले होते.यावेळी पाकिस्तान मुर्दाबाद; आतंकवाद मुर्दाबाद च्या घोषणा देण्यात आल्या.भारत जिंदाबाद मोदींचे अभिनंदन करणाऱ्या घोषणा रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी दिल्या.

रिपब्लिकन पक्षाच्या वतीने महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात भारत जिंदाबाद यात्रा काढण्यात येत आहे.आज मुंबईत भारत जिंदाबाद यात्रा मोठ्या उत्साहात काढण्यात आली.अन्य राज्यांमध्येही रिपब्लिकन पक्षाच्या वतीने भारत जिंदाबाद यात्रा काढण्यात येत आहे. मुंबईत सर्व तालुका आणि जिल्ह्यांमध्ये ही भारत जिंदाबाद यात्रा काढण्यात येणार असल्याचे ना.रामदास आठवले यांनी यावेळी जाहीर केले.



# तांबरवाडी राजेवाडी गावची बालाजी मंदिर यात्रा महोत्सव साजरा



औसा प्रतिनिधी/अमर जाधव

औसा तालुक्यातील तांबरवाडी राजेवाडी गावचे ग्रामदैवत बालाजी मंदीर येथे प्रति तीन वर्षाला यात्रा साजरी केली जाते याच परंपरेने याही वर्षी बालाजी मंदीरात यात्रा महोत्सव साजरा करण्यात आला ,दोन दिवसीय यात्रेनिमीत ह.भ.प संजय महाराज पाचपोर यांच्या सुश्राव्य वाणीतुन किर्तनाचा आनंद भाविकांनी घेतला ,व बालाजी मंदिरातील बालाजी मुर्तीला दुग्धअभिषेक करत होमहवन करत महाआरती करण्यात आली व परंपरेनुसार वाजत गाजत दिंडी काडण्यात आली व रचकर सुंदर अशा महाप्रसादाने दोन दिवसीय यात्रेची सांगता करन्यात आली यावेळी

सरपंच राधाकृष्ण जाधव .उपसरपंच राम बिराजदार ,बाळु पाटील ,राजु उजळंबे,दिपक जाधव ,प्रदिप पाटील ,बालाजी मंदिर पुजारी ,तिम्मा पवार ,शरणाप्पा पवार ,राम पवार लक्ष्मन पवार ,फुलचंद कुर्हाडे .नरसाप्पा गोटे,तिम्मा गुंजाळकर ,लक्ष्मन जाधव ,लक्ष्मन भिमा पवार ,तायाप्पा दंडगुले,सुभाष पवार ,पिंटु पवार ,यलाप्पा पवार ,कल्लापा पवार ,द्रोपदाबाई पवार ,हनमाबाई पवार ,मनिषा पवार ,रुतुजा पवार,अनिता पवार ,धोंडीराम जाधव,व्यंकाप्पा पवार ,लक्ष्मन जाधव ,नागाप्पा पवार ,मुकींदा पवार ,भिमा पवार ,गल्लापा पवार ,अबु पवार,राम धोत्रे,रेखा लस्करे ,सपणा कुसळकर,यल्लुबाई दंडगूले ,व्यंकटेश्वर मित्र मंडळ कल्लाप्पा पवार ,लक्ष्मन पवार भिमा दंडगोले,हनमंत गुंजाळकर ,तिम्मा पवार ,बालाजी शरनाप्पा पवार ,मल्लीनाथ पवार ,हनमंत गुंजाळकर ,राजु कुर्हाडे,नागेश पुजारी ,अनिल दडगुले ,आकाश राम पवार ,संतोश दंडगुले ,बालाजी गोटे .किशोर पवार ,रमेश पवार ,सुरेश पवार ,भिमा पवार ,वडार समाजातील समाजबांधवा सह तांबरवाडी राजेवाडी गावातील ग्रामस्थ उपस्थीत होते ,

# श्री गुरुदेव पतसंस्थेच्या उपाध्यक्षपदी टाकळीवाडी चे सुपुत्र विजयकुमार गणपती खोत यांची बिनविरोध निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील विजयकुमार गणपती खोत यांची गुरुदेव पगारदार नोकरांची सहकारी पतसंस्था उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल टाकळीवाडी गावामध्ये कौतुक होत आहे. श्री गुरुदेव पगारदार नोकरांची सहकारी पतसंस्था मर्यादित, सांगली या सहकारी पतसंस्थेच्या २०२४-२५ ते २०२९-३० या कालावधीसाठीच्या संचालक मंडळाची आणि पदाधिकाऱ्यांची निवड बिनविरोधपणे पार पडली. सदर कालावधी करिता अध्यक्ष म्हणून श्री. गोविंद दत्तात्रय धुमाळ यांची तर उपाध्यक्ष म्हणून श्री. विजयकुमार गणपती खोत यांची बिनविरोध निवड झाली.

# द्राक्ष पिकासाठी प्लास्टिक कव्हर तंत्रज्ञानाच्या लाभासाठी शेतकऱ्यांनी अर्ज करावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका):- द्राक्ष है महाराष्ट्रातील शेतक-यांना आर्थिक बळ देणारे महत्वाचे फळपिक आहे. द्राक्ष उत्पादक शेतक-यांना अवकाळी पाऊस, गारपीट अशा नैसर्गिक आपत्तीपासून द्राक्ष बागांना संरक्षणासाठी प्लास्टिक कव्हर घटकाचा शासकीय योजनेंतर्गत समावेश करण्याबाबत शेतकरी तसेच लोकप्रतिनीधीव्दारे सातत्याने मागणी होती. त्याअनुसरून राष्ट्रीय कृषि विकास योजनेतर्गत द्राक्ष पिकासाठी प्लास्टिक कव्हर हा प्रकल्प् द्राक्ष उत्पादक जिल्हयामध्ये राबविण्याकरीता महाडीबीटी प्रणालीवर सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

सोलापूर जिल्हयास सन २०२५-२६ साठी भौतिक १३.२० हे. व आर्थिक र.रु.७९.४६ लाख कार्यक्रम राबविण्यास मान्यता मिळाली आहे.

योजनेचा उद्देश:- गारपीट व अवकाळी पाऊस यापासून डाळिंब बागांचे संरक्षण करणे,शेतक-यांना उच्च दर्जाच्या व उच्च प्रतिच्या निर्यातक्षम द्राक्ष पिकांच्या उत्पादनासाठी आर्थिक सहाय्य करणे. फळबागांकरीता आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याकरीता शेतक-यांना प्रोत्साहन देणे. ग्रामीण भागातील युवकांना कृषि क्षेत्रात स्वयंरोजगार उपलब्ध करून देणे.

योजनेची व्याप्ती- द्राक्ष उत्पादक ८ जिल्हे अहमदनगर, पुणे, सोलापूर, नाशिक, सातारा, सांगली, जालना, उस्मानाबाद, क्षेत्र मर्यादा- २० गुंटे ते १ एकर दरम्यान प्रति लाभार्थी लाभ देय राहील. खर्चाचे मापदंड - रु.४.८१,३४४/- प्रती एकर अनुदान मर्यादा - रु.२.४०.६७२/- प्रती एकर (खर्चाच्या ५० टक्के) आवश्यक कागदपत्रे अँग्रीस्टैंक फार्मर आय डी, ७/१२ (डाळिंब पिकाच्या नोंदीसह), ८-अ, आधार कार्डाची छायांकित प्रत, आधार संलग्न बैंक खात्याचा पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत, जात प्रमाणपत्र (अनु. जाती/अनु. जमाती शेतक-यांसाठी), विहित नमुन्यातील हमीपत्र, बंधपत्र, चतुःसीमा नकाशा. योजनेच्या अधिक माहितीसाठी कृषि विभागाचे संकेस्थळ http://krishi.maharashtra.gov.in नजिकच्या कृषि विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. योजनेत सहभागी होण्यासाठी सदर घटकाचा लाभ घेण्यासाठी सर्व प्रवर्गातील शेतक-यांनी महाडीबीटी पोर्टलवर https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/griLogin या संकेस्थळावर जास्तीत जास्त शेतक-यांनी या घटकासाठी अर्ज करावेत असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले, यांनी केले आहे.


महाराष्ट्र शासन

**औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अक्कलकोट, जि. सोलापूर.**

म्हाडा कॉलनी जवळ, स्टेशन रोड, अक्कलकोट.

e-mail : itisoakt@yahoo.com websire http://www.dvet.gov.in

Industrial Training Institute

**या संस्थेत प्रवेश सत्र ऑगस्ट २०२५ करीता खालील व्यवसायामध्ये ONLINE पध्दतीने प्रवेश सुरु**

**प्रवेश सत्र ऑगस्ट २०२५**

| अ.क्र. | व्यवसाय (ट्रेड) चे नाव | कालावधी | किमान शैक्षणिक पात्रता | उपलब्ध जागा |
|---|---|---|---|---|
| १. | ड्रेसमेकींग | १ वर्ष | SSC पास/नापास | 20 |
| २. | संधाता (वेल्डर) | १ वर्ष | SSC पास/नापास | 40 |
| ३. | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक | १ वर्ष | SSC पास | 20 |
| ४. | जोडारी (फिटर) | २ वर्ष | SSC पास | 20 |
| ५. | वीजतंत्री (ईलेक्ट्रीशयन) | २ वर्ष | SSC पास | 40 |
| | | | एकुण जागा | 140 |

*** वैशिष्टये ***

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रवेश गुणवत्तेवर व शासकीय नियमा नुसार दिले जातील. | ८. | परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर अखिल भारतीय स्तरावरचे प्रमाणपत्र |
| २. | सुसज्ज प्रशासकीय इमारत व कार्यशाळा. | ९. | अनुभवी व तंत्र निदेशक वर्ग |
| ३. | रोजगार/नोकरीची खात्री देणारे प्रशिक्षण. | १०. | प्रात्यक्षिकावर आधारित प्रशिक्षण |
| ४. | पात्र प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन. दरमहा ५००/- रुपये ८०% उपस्थिती अनिवार्य | ११. | एस.टी पासची सोय |
| ५. | ग्रंथालय सुविधा, सुसज्ज AVTS Room, Computer Lab. | १२. | अद्यायावत वसतीगृह सुविधा |
| ६. | सर्व प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवारांना कंपनी मधुन अप्रेंटिशीपची संधी | १३. | निसर्ग रम्य वातावरण |
| ७. | तंत्रनिकेतनास ( Diploma) थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश (अटी लागू) | १४. | ८०% उपस्थिती आवश्यक |

*** प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे ***

| अ.क्र. | प्रवेश तपशिल | प्रवेशासाठी आवश्यक मुळ कागदपत्रे |
|---|---|---|
| १) | अनुसूचित जाती (SC) प्रवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र |
| २) | अनुसूचित जमाती (ST) प्रवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र |
| ३) | विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्ग (VJNT-1, NT-2, NT-3) | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र (३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र) |
| ४) | इतर मागास प्रवर्ग (OBC) विशेष मागास प्रवर्ग (SBC) | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र (३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र) |
| ५) | अपंग, तांत्रिक, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, बोस्टर स्कूल | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, व संबंधीत EWS प्रमाणपत्र |
| ६) | अन्य (OPEN) संवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला |
| ७) | इतर प्रमाणपत्र | NCC, MCC, जिल्हास्तर/राज्यस्तर/राष्ट्रीय क्रिडा स्पर्धा प्रमाणपत्र/रहीवाशी दाखला/तीन फोटो/आधार कार्ड, राष्ट्रीयकृत बँक पास बुक झेरॉक्स, |

* आपले प्रवेश अर्ज विहीत मुदतीत https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळा वरुन ऑनलाईन सादर करावे.
* प्रवेश माहिती पुस्तिका ही https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
* प्रवेश प्रक्रिया ही प्रवेश नियमावलीतील भाग १ व भाग २ दोन नुसार होईल.
प्रवेश प्रक्रिया शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी चालू राहील.
*

*** महत्वाची सुचना ***

१) ऑनलाईन प्रवेश भरल्यानंतर उमेदवारांना मिळालेला युजर आयडी व पासवर्ड जतन व नोंद करुन ठेवावा. पुढील प्रवेश प्रक्रियेच्या सर्व टप्पयावर अंतिम प्रमाणपत्र मिळेपर्यंत तो आवश्यक आहे.
२) ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर विहीत शुल्क भरावे.
३) अर्ज निश्चितीसाठी (Confirmation) जवळच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस भेट द्यावी. अर्ज निश्चित झाल्या शिवाय विकल्प (Option) दिसणार नाही.
४) अर्ज निश्चितीची पावती व निश्चित केलेल्या अर्जाची प्रत प्राप्त करुन घ्यावी व प्रवेश फेरीच्या वेळी संस्थेत सादर करावी.
५) अर्ज निश्चिती करताना भरलेल्या अर्जाची एक प्रत व सर्व आवश्यक कागदपत्राची झेराक्स प्रत जोडावी. तसेच आवश्यक तेवढ्या प्रती काढून स्वतः जवळ ठेवाव्यात.
६) उमेदवाराने आपला अर्ज भरताना स्वःताचा किंवा आपल्या कुंटुबातील सदस्याचा चालू असलेला मोबाईल क्रमांक व आपला ई-मेल आयडी बिनचूक पणे नोंदवावा. प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत दिलेला मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी, बदलू नये. नोंदविलेला मोबाईल क्रमांक आपल्या आधार कार्डशी व बँक खात्याशी जोडलेला असणे आवश्यक आहे. त्या शिवाय SID पोर्टलवर आपला PRN जनरेट होणार नाही.
७) निश्चित झालेल्या अर्जाची (Confirmed Application) प्रत व शुल्क भरल्याची पावती जपून ठेवावी.
८) प्रशिक्षणार्थ्याने प्रशिक्षण अर्धवट सोडल्यास पुर्ण प्रशिक्षण शुल्क वसुल करण्यात येईल.
९) प्रवेशाच्या वेळी सर्व मुळ कागदपत्रे व तीन झेरॉक्स सेट सोबत आणावे.
१०) प्रवेश निश्चित झाले नंतर जमा केलेले प्रशिक्षण शुल्क व अनामत रक्कम परत मिळणार नाही.
११) ऑनलाइन स्वरुपात शुल्क स्वीकारले जाणार नाही.

*** प्रवेशित उमेदवारांना खालील प्रमाणे शुल्क रोखीने भरावे लागेल. ***

| अ.क्र. | व्यवसायाचे नाव | कालावधी | खुल्या गटा करीता वार्षिक शुल्क रुपये (Open) | (Open) Total Rs. | मागासवर्गीया करीता वार्षीक शुल्क रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1. | वीजतंत्री (इलेक्ट्रीशयन) | 02 वर्षे | 2 वर्षे प्रशिक्षण शुल्क 2000+600 अनामत + 50 ओळखपत्र +200 ग्रंथालय +200 सांस्कृतिक कार्य +200 इंटरनेट | 02 वर्षे 3250/- | 02 वर्षे 1250/- |
| 2. | जोडारी (फिटर) | 02 वर्षे | 2 वर्षे प्रशिक्षण शुल्क 2400+600 अनामत + 50 ओळखपत्र +200 ग्रंथालय +200 सांस्कृतिक कार्य +200 इंटरनेट | 02 वर्षे 3650/- | 02 वर्षे 1250/- |
| 3. | वेल्डर (संधाता) | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 1200+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 2150/- | 01 वर्षे 950/- |
| 4. | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 1000+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 1950/- | 01 वर्षे 950/- |
| 5. | ड्रेसमेकींग | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 800+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 1750/- | 01 वर्षे 950/- |
| 6. | वसतिगृह | | अनामत 1000/वार्षिक शुल्क 1200 | 2200/- | 2200/- |

टीप :
प्रवेशाच्या सविस्तर माहिती साठी संस्थेत प्रत्येक्ष संपर्क साधावा.

प्राचार्य
औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अक्कलकोट
जिल्हा सोलापूर.


# घरकुल सर्वेक्षणासाठी पंधरा दिवसाची मुदत वाढ मिळावी; माजी आमदार संजय मामा शिंदे यांची पालकमंत्र्याकडे मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

प्रधानमंत्री आवास योजना( ग्रामीण) योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील बेवार तसेच कच्च्या घरात राहणाऱ्या कुटुंबांचा आवाज प्लस २०२५ सर्वेक्षण सध्या करमाळा तालुक्यात सुरू असून शासनाने या सर्वेक्षणासाठी अंतिम मुदत वाढवून ती ३१ मे २०२५ पर्यंत केले होते. शासनाने मुदतवाड वाढवून दिली खरी परंतु करमाळा तालुक्याचे संपूर्ण सोलापूर जिल्हा महाराष्ट्र राज्यातच १५ मे पासून अवकाळी पावसाने थैमान घातल्यामुळे अनेक ठिकाणी संबंधित गावातील ग्रामसेवक ग्राम विकास अधिकारी घरकुल सर्वेक्षण साठी गावातील वाडी, वस्ती, वरती पोहोचू. शिकली नाहीत. त्यामुळे अद्यापही अनेक कुटुंबी सर्वेक्षणापासून वंचित आहेत ही समस्या आपण ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे काल मुंबई येथे विधिमंडळात भेट घेऊन



मांडले आहे व विमान पंधरा दिवसाची मुदत वाढ सर्वेसाठी मिळावी अशी मागणी केली असल्याची माहिती माजी आमदार संजय मामा शिंदे यांनी दिली.

तुझ्या कुटुंबांना आज पर्यंत घरकुल योजनेचा लाभ मिळालेल्या नाही, अशा गुरुजी व पात्र लाभार्थींनी आपल्या ग्राम पंचायत कार्यालयातील ग्रामसेवक किंवा ग्रामविकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधून आपली सर्वेक्षण तात्काळ करून घ्यावे असे आवाहन माजी आमदार शिंदे यांनी केले आहे.

घरकुल प्राप्त असणाऱ्या लाभार्थ्यांना शासनाच्या वतीने अल्पदरात किंवा मोफत वाळू उपलब्ध करून द्यावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

**भाविकांना विठुरायाचे सुलभ दर्शन व्हावे** — **दत्तात्रय बडवे-शिंदे यांची मागणी**

# २० फुटावरून भाविकांच्या विठ्ठलाच्या मुखदर्शनाला मुख्यमंत्र्यांच्या महापुजेच्या संकल्पाचा अडथळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी :

पर्यायी जागा हत्ती दरवाज्यासमोरील गजेंद्र मंडपात ह.भ.प.आजरेकर फडाचा विणा पहारा चालतो त्या जागेलगत आषाढी एकादशीच्या महापुजेवेळी मुख्यमंत्र्यांच्या पुजेचा संकल्प सोडण्यात यावा, असे दत्तात्रय बडवे-शिंदे यांनी सांगितले.

श्री विठ्ठलाचे मुखदर्शन पितळी दरवाज्यापासून प्रवेश केल्यानंतर ५ फुट अंतरावरून सुरू आहे परंतू तेथून श्री विठ्ठलाचे मुख व मुर्ती दिसून येत नाही अंदाजे ८० फुटावरून मुखदर्शन आहे. परंतू रूक्मिणीमातेचे मुखदर्शन जवळून आहे परंतु श्री विठ्ठलाचे मुखदर्शन लांब आहे. सध्या पददर्शन करून भाविक हत्ती दरवाज्यातून बाहेर पडतात त्यामुळे पंख्याखाली चौखांबीमध्ये हत्ती दरवाज्याच्या समांतर अंतरावरून मुखदर्शन घेतल्यास श्री विठ्ठल मुर्ती भाविकांना स्पष्ट व जवळून दर्शन मिळेल म्हणून आराखड्यासहीत आम्ही गेले १० वर्षापासून मागणी करीत आहोत. त्याप्रमाणे मंदिर समितीच्या सहअध्यक्ष ह.भ.प.औसेकर महाराज, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी



सदर जागेवर मुख्यमंत्र्यांच्या एकादशीचा महापुजेचा संकल्प करणार आहेत म्हणून सदर ठिकाणावरून मुखदर्शन सुरू करता येत नाही असे सांगितले आहे. तरी याला पर्याय म्हणून पुर्वी अनेकवेळा हत्ती दरवाज्यासमोरील गजेंद्र मंडपात ह.भ.प.आजरेकर फडाचा विणा पहारा चालतो त्या जागेलगत आषाढी एकादशीच्या महापुजेवेळी मुख्यमंत्र्यांच्या पुजेचा संकल्प सोडण्यात यावा. यापूर्वी अनेक मुख्यमंत्र्यांचे या जागेवरच संकल्प झाले आहेत व लगेच हत्ती दरवाज्याने मुख्यमंत्री पुजेला जावू शकतात व मुख्यमंत्र्यांच्या पुजेत व्हीआयपीची गर्दी होणार नाही तरी सदर मागणीचा विचार करावा ही विनंती.